PRESS RELEASE

RESERVE BANK OF INDIA

**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

सप्टेंबर १६, २००४

**सर्व प्रकारची दर्शनी मूल्यांची नाणी या वैध मुद्रा आहेत - रिझर्व्ह बँक**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निदर्शनास आले आहे व, तसेच बँकेकडे तक्रारीही आल्या आहेत, की दुकानदार, व्यापारी, वाहतुक व्यावसायिक, सरकारी विभाग इत्यादी, २५ पैशांची व ५० पैशांची नाणी ही आता वैध मुद्रा नसल्याचे, तसेच ती बँकांच्या शाखा स्वीकारत नसल्याचे कारण देऊन ही नाणी स्वीकारण्यास सहज तयार होत नाहीत.

जनतेच्या हितार्थ स्पष्ट करण्यात येत आहे की २५ पैसे व ५० पैशांसह सर्व नाणी वैध मुद्रा असून ती तशीच राहतील. त्यामुळे नाणी स्वीकारण्यास कोणीही टाळाटाळ करणे योग्य नाही. रिझर्व्ह बँकेने सर्व व्यापारी बँकांना सर्व प्रकारची नाणी स्वीकारुन त्या बदल्यात नोटा देण्यासाठी मुक्तपणे ती स्वीकारण्यास सांगितले आहे. रिझर्व्ह बँकेची कार्यालयेसुद्धा बदली नोटा देण्यासाठी मुक्तपणे नाणी स्वीकारणे सुरु ठेवतील.

रिझर्व्ह बँकेने २५ व ५० पैशांची नाणी चलनातून काढून घेतल्याच्या कोणत्याही अफवांवर जनतेने विश्वास ठेवू नये. २५ पैशांची व ५० पैशांची नाणी वैध मुद्रा असून पुढेही तशीच राहतील.

**पी. व्ही. सदानंदन**
**व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००४-२००५ ३०७**